सकाळ TODAY



औंध : पोलिस भरतीपूर्व प्रशिक्षण कार्यशाळेत विद्यार्थ्यांना संबोधित करताना माजी उपविभागीय पोलिस अधिकारी संभाजी पाटील.

# औंध येथे पोलिस भरतीपूर्व मार्गदर्शन

**औंध** : राजा श्रीपतराव भगवंतराव महाविद्यालय औंध येथे चारुशीलाराजे स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्र यांच्या माध्यमातून पोलिस भरतीपूर्व प्रशिक्षण कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. याप्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून माजी उपविभागीय पोलिस अधिकारी संभाजी पाटील आणि कोरेगाव विभागाचे उपविभागीय पोलिस अधिकारी गणेश किंद्रे हे उपस्थित होते. यावेळी महाविद्यालयाच्या प्राचार्या एस. एस. सावंत यांनी प्रमुख पाहुण्यांचा सत्कार करून प्रास्ताविक केले. तर प्रा. एस. आर. भोसले यांनी प्रमुख पाहुण्यांची विद्यार्थ्यांना ओळख करून दिली. यावेळी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना संभाजी पाटील आणि गणेश किंद्रे यांनी मार्गदर्शन केले. प्रा. अजित कांबळे यांनी सूत्रसंचालन केले तर जगन्नाथ ननावरे यांनी आभार मानले. कार्यशाळेच्या यशस्वितेसाठी प्रा. रूपेश जाधव आणि प्रा. तुषार सावंत यांनी सहकार्य केले.